भाग ४

।। चिंतनक्षण ।।

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

।। चिंतनक्षण ।।

भाग : ४

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

*** चिंतनक्षण : भाग-४ ***

पुस्तकरूपाने प्रकाशित सातवी आवृत्ती : सप्टेंबर २०१४

डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com

युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka

अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

जगलेली वर्षे बहुतेकांच्या जमेला असतात. पण त्यात आलेले अनुभव आणि त्यानुसार सर्वोच्च ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक प्रयत्न व परिवर्तन किती लोकांच्या जमेला असते?९१

गुरूंच्या एखाद्या वाक्याचा अर्थ
कळायला अनेक वर्षे जातात.
आचरण किती दूर असेल ?[९२]

देहापेक्षा काही महत्त्वाचे व मोठे
ध्येय माणसाला सापडले म्हणजे
मग मृत्यूचे भय उरत नाही.[९३]

माझ्याकडे दृश्याच्या पलीकडे जायचे सामर्थ्य आहे, पण मला त्याची कल्पनाही नाही व खात्रीही नाही. हा माझ्या प्रगतीतला पहिला व मोठा अडथळा आहे.९४

मला सारखे कुणीतरी 'व्हायचे' असल्यामुळे मी कोण 'आहे' याकडे लक्ष देण्यास सवडच मिळत नाही. वस्तुतः मी कोण 'आहे' याकडे लक्ष देणे खरे गरजेचे आहे - मी कुणी 'होण्या'साठीही, खरे तर मी कुणी व्हायची आवश्यकता नाही हे कळण्यासाठीही आणि खऱ्या आनंदाच्या प्राप्तीसाठीही !९५

मी जे काही करतो
त्यात आनंद टिकत नसेल
तर मार्ग चुकतो,
असे समजावे.९६

आपल्याला आपल्या तात्कालिक हिताची चिंता पडलेली असते, गुरूंना आपल्या अंतिम हिताची चिंता पडलेली असते. त्यामुळे आपली गुरूंना चिंताच नाही असे अनेकांना वाटते.९७

प्रापंचिक म्हणतो मी हळूहळू
सारे गोळा करून सुखी होईन,
पारमार्थिक म्हणतो मी हळूहळू
सगळे टाकून सुखी होईन.९८

सद्गुरूंचे खरे म्हणणे ओळखण्यासाठी सावधानता व परिपक्वता यांची आवश्यकता असते.९९

आपल्याला खरी भूक कशाची आहे, हे वय वाढले तरी माणसाला कळत नाही. म्हणून त्या अर्थाने त्याचे बालपण काही सरता सरत नाही.[१००]

देहात बुडून राहून देव गाठतो
म्हणणे म्हणजे घरात राहून
गावाला जाईन
म्हणण्यासारखे आहे.१०१

भगवंत भक्ताच्या
गरजा भागवतो,
अपेक्षा नव्हे.१०२

निसर्ग इतर विकास स्वतः समानपणे घडवून आणतो, फक्त माणसाच्या अंतर्जीवनाचा विकास त्याने विश्वासाने व कौतुकाने माणसावर सोपवला आहे.[१०३]

आपल्या आंतरिक शुद्धीकरणाला व परिवर्तनाला आवश्यक तेवढीच कर्मे करण्यात कौशल्य आहे. अन्यथा कर्मांत अडकायला होते.१०४

स्वतःची अपूर्णता जाणवणे, मान्य करणे व पूर्णतेची गरज वाटणे - हा भक्तीचा पहिला टप्पा आहे.१०५

जीवदशेत माणूस सर्वांगाने जीव असतो,तसे भक्तिदशेत माणूस सर्वांगाने भक्त असणे आवश्यक आहे.[१०६]

तंबोरा गायकाला त्याच्या गाण्याच्या आधारभूत मूळ स्वराचे-पट्टीचे सदैव भान देत असतो. तसे जगताना नाम आपल्याला सदैव आपण कुणाचे आहोत - त्या मूळ स्वरूपाचे भान देत असते.१०७

जे देवाने दिले आहे त्या सर्वाबद्दल जाणीव टिकत नाही,म्हणून दु:ख आहे.१०८

नाम घेणे एक वेळ सोपे आहे,
पण एरवीच्या काळात नामाला
पूरक कर्मे करीत राहाणे
कठीण आहे.१०९

दुःख असणे ही वेगळी गोष्ट आहे व दुःखाची सवय होणे ही वेगळी गोष्ट आहे. पहिल्यात वस्तुस्थिती असेल पण दुसऱ्यात धोका आहे.११०

जग चुकते आहे असे म्हणून
बरोबर असण्याची
माझी जबाबदारी मी
टाळू शकत नाही.१११

संतांनी जगावर अनेक उपकार केले आहेत. त्यातल्या त्यात ते आपल्याबरोबर राहिले व आपल्याशी बोलले, हे त्यांचे दोन अविस्मरणीय उपकार आहेत.११२

भगवंताच्या सेवेतील पंचमहाभूते
सामान्य जिवाला उद्धारासाठी
मार्ग मिळावा म्हणून देहरूपाने
जिवाच्या सेवेत राबतात, हे जिवावर
केवढे उपकार आहेत !११३

सामान्य माणसांनी आपल्या
दुःखाच्या सबबी पुढे करून साधना
टाळू नये, म्हणून बहुधा परमेश्वराने
सर्व प्रकारची दुःखे संतांना त्यांच्या
आयुष्यात सोसायला दिली आहेत.११४

समजून न घेतल्यास
सुधारणेची संधीच नाही.११५

ज्यांना गुरूंच्या प्रेमळ, निःस्वार्थ, विनामूल्य सांगण्याची किंमत ओळखता येत नाही, त्यांना त्यांच्या प्रगतीसाठी मग आपल्या आयुष्याची व स्वानुभवाची जबर किंमत मोजावी लागते.११६

अंतकाळच्या स्मरणाच्या प्रकाशात जो जीवनाचा ग्रंथ वाचील, त्याला तो अधिक कळेल.[११७]

माणुसकीची परीक्षा
पास व्हायचे,तर कृतज्ञतेचा
अभ्यास करावाच लागतो.११८

देह सोडा आणि देव घ्या - असा परमार्थाचा कळायला सोपा व आचरायला अवघड मार्ग आहे.११९

देवाच्या आपल्याकडून
कोणत्या अपेक्षा आहेत हे
जाणून घेण्यासाठी अधूनमधून
देवदर्शनाला जात असावे.१२०

डॉ. सुहास पेठे यांची ही बोधवचने म्हणजे शुद्ध परमार्थमार्गावरील अभ्यासू व्यक्तींना चिंतनाची एक पर्वणीच होय. कारण या वचनांमागे डॉ. पेठे यांचे तीन तपांचे मूलगामी चिंतन, स्वानुभव, अभ्यास, प्रयोग अशी विस्तृत पार्श्वभूमी आहे. शुद्ध परमार्थाचे आकलन व आचरण यांसाठी त्यांची ही वचने आमच्याप्रमाणे इतरांनाही उपयोगी ठरतील म्हणून संकलित व प्रकाशित होत आहेत.

* संतछाया, सातारा *